**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांक : 17.03.2024** **रविवार**

---

**ठळक बातम्या**

1. **देशात लोकसभा निवडणूक सात टप्प्यांमध्ये होणार, चार जूनला मतमोजणी; एकंदर 97 कोटी मतदारांपैकी 1 कोटी 82 लाख नवे मतदार.**
2. **महाराष्ट्रात 19 एप्रिलपासून पाच टप्प्यांमध्ये लोकसभा जागांसाठी मतदान; सर्वत्र आचारसंहिता लागू.**
3. **अंमली पदार्थ तस्कर ललित पाटील याच्यासह १४ जणांविरुद्ध आरोपपत्र दाखल.**
4. **महिला प्रिमियर लीग क्रिकेटमध्ये आज विजेतेपदासाठी लढत.**

**आणि**

5. **विदर्भात तुरळक ठिकाणी 19 तारखेपर्यंत विजा, जोराचे वारे आणि गारपिटीसह पावसाचा इशारा.**

**लोकसभा**

देशातील आगामी लोकसभा निवडणुका 19 एप्रिलपासून सात टप्प्यांमध्ये होणार आहेत. मतमोजणी 4 जून रोजी हाती घेण्यात येईल असं मुख्य निवडणूक आयुक्त राजीवकुमार यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत जाहीर केलं. यासोबतच संपूर्ण देशभरात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. देशामध्ये 97 कोटी नोंदणीकृत मतदार असून त्यापैकी 1 कोटी 82 लाख मतदार प्रथमच मतदान करणार आहेत. वर्तमान लोकसभेचा कार्यकाळ यावर्षी 16 जून रोजी संपत आहे. सिक्कीम, ओडिशा, आंध्र प्रदेश आणि अरुणाचल प्रदेश विधानसभा निवडणुकांची घोषणाही यावेळी करण्यात आली. लोकसभा निवडणुकीचा 102 जागांसाठीचा पहिला टप्पा 19 एप्रिलला, 89 जागांसाठी होणारा दुसरा टप्पा 26 एप्रिल तर 94 जागांवर लढला जाणारा तिसरा टप्पा 7 मे रोजी पार पडेल. 96 जागांसाठी चौथ्या टप्प्याचं मतदान 13 मे, 49 मतदार संघांसाठी पाचव्या टप्प्याचं मतदान 20 मे, 57 जागांसाठीचा सहावा टप्पा 25 मे, तर 57 लोकसभा मतदार संघासाठीचा सातवा आणि शेवटचा टप्पा 1 जूनला होणार आहे.

भारतीय लोकशाहीच्या सगळ्यात मोठ्या उत्सवासाठी निवडणूक आयोग तयार असल्याचं मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी सांगितलं. देशात 97 कोटी नोंदणीकृत मतदार असून 10 लाख 50 हजार मतदान केंद्रांवर दीड कोटी कर्मचारी कार्यरत राहणार असल्याचं ते म्हणाले. वय वर्ष 85 आणि त्यापेक्षा

जास्त वय असलेले नागरिक तसंच दिव्यांग व्यक्तींसाठी घरबसल्या मतदानाची सुविधा द्यायला तयार असल्याचं कुमार यांनी सांगितलं. गंभीर गुन्हे दाखल असलेल्यांना उमेदवारी का दिली हे सुद्धा राजकीय पक्षांना स्पष्ट करावं लागेल. पैसा तसंच चुकीची माहिती ही मुक्त आणि निष्पक्ष निवडणूक आयोजित करण्यामधील  आव्हानं असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

महाराष्ट्रात पाच टप्प्यात मतदान होणार आहे. पहिला टप्प्यात १९ एप्रिलला रामटेक, नागपूर, भंडारा-गोंदिया, गडचिरोली-चिमूर, आणि चंद्रपूर इथं मतदान होणार असून दुसऱ्या टप्प्यात २६ एप्रिलला बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ-वाशिम, हिंगोली, नांदेड, आणि परभणी इथं मतदान होईल. तिसऱ्या टप्प्यात ७ मे रोजी रायगड, बारामती, धाराशीव, लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, कोल्हापूर आणि हातकणंगले इथं मतदान होणार असून, चौथ्या  टप्प्यात १३ मे रोजी नंदूरबार, जळगाव, रावेर, जालना, छत्रपती संभाजीनगर, मावळ, पुणे, शिरुर, अहमदनगर, शिर्डी आणि बीड इथं मतदान होईल. पाचव्या टप्प्यात २० मे रोजी धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण, ठाणे आणि मुंबईतल्या सहा मतदारसंघात मतदान होणार आहे. राज्यातील सर्वच जिल्ह्यांमध्ये आचार संहिता लागू झाली असून निवडणूक यंत्रणा सज्ज करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले असल्याचं आमच्या बातमीदारांनी कळवलं आहे.

लोकसभा निवडणुकीकरीता महाराष्ट्रामध्ये प्रत्येक उमेदवाराला खर्चाची मर्यादा 95 लाख रुपये ठेवण्यात आली आहे. राज्यात 15 मार्चअखेर एकंदर 9 कोटी 20 लाख 70 मतदार नोंदणीकृत आहेत. निरंतर मतदार नोंदणीचा कार्यक्रम सुरु आहे. मतदार नोंदणी झालेली नाही, अशा पात्र नागरिकांकडून संबंधित टप्प्यातील उमेदवारांचे उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अंतिम दिनांकाच्या 10 दिवस आधीपर्यंत प्राप्त झालेले अर्ज क्रमांक 6; मतदार यादीमध्ये नोंद घेण्यासाठी विचारात घेण्यात येतील असं राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी तथा प्रधान सचिव एस. चोक्कलिंगम यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत सांगितलं.

**पदभार**

पुणे महापालिका आयुक्त म्हणून डॉक्टर राजेंद्र भोसले यांनी काल विक्रमकुमार यांच्याकडून पदभार स्वीकारला. विक्रमकुमार यांची एम एम आर डी ए च्या अतिरिक्त आयुक्तपदी बदली करण्यात आली आहे. गेली तीन वर्षे आठ महिने विक्रम कुमार यांनी पुणे महापालिका आयुक्त म्हणून काम पाहिलं.

**अनुराधा पौडवाल**

ज्येष्ठ गायिका अनुराधा पौडवाल यांनी राजकारणामध्ये पाऊल ठेवत काल भाजपामध्ये प्रवेश केला. पक्षाचे सचिव अरुण सिंह यांच्या उपस्थितीत दिल्लीच्या पक्ष मुख्यालयात हा कार्यक्रम पार पडला.

**या प्रादेशिक बातम्या आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात...**

**ससून परिषद**

पुण्यातील बी. जे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि ससून सर्वोपचार रूग्णालयाच्या रिसर्च सोसायटीची सुवर्णमहोत्सवी परिषद पार पडली. या परिषदेमध्ये जंतुसंसर्ग प्रतिबंध, उपचार आणि नवीन संशोधन या विषयावर तज्ज्ञांनी सादरीकरण केलं. या परिषदेसाठी महाराष्ट्रासह इतर राज्यातून १४०० डॉक्टर्स उपस्थित होते. जंतुसंसर्ग या विषयाशी निगडीत २०० हून अधिक संशोधनं सादर करण्यात आली. महाराष्ट्रातील विविध वैद्यकीय महाविद्यालयांमधून अहवाल आणि भित्तीपत्रं मांडण्यात आले.

**गोवर-रूबेला-लसीकरण**

गोवर रूबेला आजाराचं डिसेंबर २०२४ पर्यंत निर्मूलन करण्यासाठी कॅच अप मोहीम सुरू करण्यात आली आहे. या अतंर्गत लसीकरणापासून वंचित राहिलेल्या सात हजार ३७७ बालकांना एमआर लसीची पहिली, तर ५ हजार ५ शे ७४ बालकांना दुसरी मात्रा देण्यात येणार आहे. आरोग्य विभागाकडून कॅच अप मोहिमेत गेल्या तीन महिन्यांमध्ये लसीकरणाचं ८७ टक्के उद्दिष्ट पूर्ण करण्यात आल्याची माहिती राज्य लसीकरण अधिकारी डॉक्टर प्रविण वेदपाठक यांनी दिली.

**ललित**

अमली पदार्थ तस्कर ललित पाटील याच्यासह १४ जणांविरुद्ध पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेनं विशेष न्यायाधीश व्ही. आर. कचरे यांच्या न्यायालायात आरोपपत्र दाखल केलं आहे. यामध्ये पोलिसांनी महत्वाचे पुरावे न्यायालयात सादर केले आहेत. ललित आणि साथीदारांनी नाशिक परिसरातील शिंदे गावात बंद पडलेल्या कारखान्यात मेफेड्रोन निर्मिती सुरू केली होती. अमली पदार्थ तस्करी, विक्रीचं जाळं त्यानं साथीदारांच्या मदतीनं निर्माण केलं होतं. तो मोठ्या तस्कराच्या संपर्कात असल्याचं तपासात उघडकीस आलं, असं आरोपपत्रात म्हटल आहे. पोलिसांनी १०० हून जास्त साक्षीदारांची यादीही जोडली आहे.

**कविता**

कविता हे संजीवन असून कवितेचा संजीवन संस्कार आज हरवत चालला आहे, अशी खंत ज्येष्ठ कवी अशोक नायगावकर यांनी काल पुण्यात साहित्यदीप प्रतिष्ठानतर्फे आयोजित काव्य महोत्सवात व्यक्त केली. या दोन दिवसीय संमेलनाचं उद्घाटन ज्येष्ठ साहित्यिक डॉक्टर राजा दीक्षित यांच्या हस्ते काल झालं. मराठी भाषा आपल्या घरातील तिसऱ्या पिढीपर्यंत तितक्याच ताकदीनं पोहोचते आहे की नाही, हे पाहायला हवं. 'कवी' ही फार मोठी पदवी आहे आणि भाषेच्या सुदृढतेची जबाबदारी आपसुकच कवीकडे येत असते असं मत नायगावकर यांनी व्यक्त केलं.

**नक्षल मृत्यू**

गडचिरोलीमधल्या अबुझमाडच्या जंगलात राहून नक्षल्यांना मार्गदर्शन करणारा जहाल नक्षली आणि नक्षल्यांच्या दक्षिण विभागाचा सचिव कोपा उर्फ मनोज उसेंडी याचं शुक्रवारी दीर्घ आजारानं निधन झालं. मनोज उसेंडी हा ४० वर्षांहून अधिक काळापासून नक्षल चळवळीत कार्यरत होता.

**कांदळ वन**

ठाणे खाडी क्षेत्रात येणाऱ्या नवी मुंबईतल्या चाणक्य तलावामधील खारफुटीची झाडं मोठ्या प्रमाणात तोडली जात आहेत. याविरोधात स्थानिक प्रकल्पग्रस्तांच्या संघटनांसोबतच परिसरातील नागरिक, संस्थांनी काल या परिसरात आंदोलन केलं. या तलावात मोठ्या प्रमाणात फ्लेमिंगो पक्षी तसंच समुद्री जीवांचा वावर असतो. हा तलाव मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार संरक्षित क्षेत्र आहे मात्र नवी मुंबई महानगरपालिकेच्या विकास आराखड्यात हे कांदळवन आरक्षण काढण्यात येवून रहिवासी वापरासाठी बदल करण्यात आला आहे. त्यामुळे हा तलाव संरक्षित करावा आणि कांदळवनांच रक्षण करावं अशी मागणी या आंदोलनकर्त्यांनी केली आहे.

**जोगदेव**

ज्येष्ठ क्रीडा पत्रकार हेमंत जोगदेव यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी काल पुण्यात राणा प्रताप संघातर्फे काल सभेचं आयोजन करण्यात आलं होतं. हेमंत जोगदेव यांच्या निधनामुळे क्रीडा क्षेत्रातील एका ध्यास पर्वाचा अंत झाला असून ऑलम्पिक कोश तयार करण्याचं त्यांचं अपूर्ण राहिलेलं स्वप्न पूर्ण करणं हीच खरी श्रद्धांजली ठरेल अशी अपेक्षा उपस्थित मान्यवरांनी यावेळी व्यक्त केली.

**क्रिकेट**

महिला प्रिमियर लीग क्रिकेटमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि दिल्ली कॅपिटल्स या संघांमध्ये नवी दिल्लीत विजेतेपदासाठी लढत होणार आहे.

**हवामान**

विदर्भात तुरळक ठिकाणी 19 तारखेपर्यंत वीजा, जोराचे वारे आणि गारपिटीसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. नागपूर शहरात काल मुसळधार पावसासह गारपीट झाली. नांदेड जिल्ह्यातही काल संध्याकाळी गारांचा पाऊस झाला. या पावसामुळे रबी पिकांना मोठा फटका बसला. काढणीला आलेला गहू भिजल्यामुळे शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालं. नांदेड शहरासह जिल्ह्यात ढगाळ वातावरण आहे. त्यामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**